**मा.मुख्यमंत्र्यांनी कोपरी रेल्वे पुलाचे केले उद्‌घाटन**

**मुंबई आणि ठाणे जिल्ह्याच्या सीमेवर प्रवाशांची वाहतूक कोंडीपासून सुटका**

**मुंबई, ९ फेब्रुवारी, २०२३:**

मुंबई-ठाणे जिल्ह्याच्या सीमेवर प्रवाशांची वाहतूक कोंडीपासून सुटका करण्याच्या दृष्टीने ठाणे शहरातील कोपरी येथे २+२ पथ मर्गिकेच्या रेल्वे ओलंडणी पुलाचे ४+४ मार्गिका असे रुंदीकरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे. कोपरी रेल्वे ओलांडणी पुलाच्या कामाचा संपूर्ण खर्च एमएमआरडीएमार्फत करण्यात आला आहे. पुलाच्या रेल्वे मार्गिकांवरील भागाचे काम मध्य रेल्वे मार्फत करण्यात आले असून या भागाच्या बांधकामाकरीता प्राधिकरणकडून रेल्वेला निधी देण्यात आला आहे. या पुलाची लांबी ७४८ मीटर तर रुंदी ३७.०४ मीटर इतकी आहे.

पूर्व द्रुतगती महामार्गावर हा ५+५ मार्गिकांचा आहे तर ठाणे शहारातील कोपरी रेल्वे ओलांडणी पुल हा २+२ मार्गिकांचा होता, या अरुंद रेल्वे ओलांडणी पुलामुळे सकाळ व संध्याकाळच्या कालावधीत या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत होती. सदर वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्याच्या उद्देशाने प्राधिकरणामार्फत कोपरी रेल्वे ओलांडणी पुलाचे रुंदीकरण व बांधकाम करण्यात आले आहे. २+२ पथ मर्गिकेच्या पुलाचे २+२ असे अपग्रेड केल्यामुळे मुंबई-ठाणे जिल्ह्याच्या सीमेवरील वाहतूक कोंडी कमी होऊन फायदा पूर्व द्रुतगती महामार्गावरील लहान तसेच अवजड वाहनांना होणार आहे.

या प्रकल्पात नौपाडा जंक्शन ते ज्ञानसाधना कॉलेज पर्यंत महामार्गा खालून वाहानांच्या रहदारीकरीता २+२ मार्गिकांचा ४० मीटर लांब आणि २१.१ मीटर रुंद भुयारी मार्ग देखील बांधण्यात आला आहे. प्रस्तावित नवीन कोपरी स्टेशनला जोडणारा वाहनांसाठी भूयारीमार्ग, पादचाऱ्यांना पूर्व द्रुतगती महामार्ग ओलांडण्यासाठी पादचारी पूल देखील बांधण्यात आला आहे. तसेच चिखलवाडी परिसरातील पावसाळी पाण्याचा निचरा होण्याकरीता, चिखलवाडी नाल्यापासून साठेवाडी नाल्यापर्यंत पर्जन्य जल वहिनीची (स्ट्रॉम वॉटर ड्रेनची) सुविधा उपलब्ध करून देणारा बंधिस्त नाल्याचे सुधारीकारण देखील करण्यात आले आहे.

**"कोपरी पूल हा मुंबई आणि ठाणे या दोन्ही जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. जुना पूल हा अरुंद असल्यामुळे व्यस्त तासांत (पीक अवर्स) मध्ये वाहनचालकांना काही मीटरचा प्रवास करण्यासाठी ३० ते ४० मिनिटे लागतात. पूर्व द्रुतगती महामार्गावरील दोन्ही बाजूने येणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात कोंडी होत होती. नवीन रुंद पुलामुळे प्रवाशांचा आता हा वेळ वाचणार आहे. त्यासोबतच तीन हात नाका परिसरातील वाहतुकीत मोठ्या प्रमाणात घट होणार आहे" असे एमएमआरडीएचे महानगर आयुक्त श्री एस.व्ही.आर. श्रीनिवास, भा. प्र.से., म्हणाले.**

**Hon. Chief Minister Shri. Eknath Shinde Inaugurated Kopri ROB**

**Major Relief to the passengers from traffic congestion on the border of Mumbai and Thane districts**

**Mumbai, 9 February, 2023:**

In order to decongest traffic jam at the border of Mumbai Thane district Mumbai Metropolitan Region Development Authority has upgraded the 2+2 lane railway Over Bridge to 4+4 lane at Kopri in Thane city . The entire cost of 784 meters long and 37.04 mtr. Wide bridge has been borne by MMRDA. The bridge portion over the railway crossing is constructed by Central Railway for which MMRDA funded them.

The vehicular traffic coming from 5+5 lane EEH on 2+2 lane Kopri bridge is max during the peak hours. Kopri becoming bottle neck during peak hours, because of which crossing Kopri bridge was a tough task. After the widening of Kopri bridge the border of Mumbai-Thane district will become traffic congestion free, also benefits small and heavy both type of vehicles on the Eastern Expressway.

This project includes construction of 40 meter long and 21.2 meter wide 2+2 lane Vehicular Underpass connecting Naupada junction to Dnyansadhana college and Proposed new Kopri station. Also constructed FOB facility for pedestrians to cross the eastern express highway. Improvement of Box Nalla at Chikhalwadi area, which will provide drainage facility of storm water drain from existing Chikhalwadi nalla to Sathewadi Nalla.

**"Kopri Bridge is an imperative link connecting Mumbai and Thane districts. As the old bridge was narrow, caused heavy traffic jam on both sides of EEH. Motorists was taking 30 to 40 mins to cover few meters during peak hours. Due to the new wide bridge, the passengers will now save their precious time and fuel. Along with this, there will be a big reduction in the traffic at Three Hat Naka as well"** said S.V.R. Srinivas, Hon. Metropolitan Commissioner, MMRDA.






एम एम आर डी ए
MMRDA
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
कोपरी रेल्वे ओलांडणी पुलाचा
लोकार्पण सोहळा
गुरुवार दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२३ रोजी
शुभ हस्ते
मा.ना.श्री. एकनाथ शिंदे


25 HOUR LIFE


25 HOUR
LIFE


BEGUN
Legacy